भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०२/२०१७

**१) शासकीय पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईपची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०४/०२/२०१७ चे १९.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी उषा रामचंद्र डोंगरवार वय ५० वर्ष, रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा हा कृषी विज्ञान केंन्द्र साकोली येथे समन्वय या पदावर कार्यरत असतांना कृषी विज्ञान केंन्द्र साकोली येथे शेतीला देण्याचे पाईप लाईन चुलबंद नदीचे पुलीया जवळ केली असल्याने यातील आरोपीने चुलबंद नदी पुलाजवळील कृषी विज्ञान केन्द्र व शासकीय पाणी पुरवठा योजनेचे लोखंडी पाईप बाहेर काढुन ३ पाईप चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,५११ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. पवनी, अडयाळ, मोहाडी, कारधा व वरठी येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन १० हातभट्टी दारु किंमती ५००/—रु. व ०६ लिटर ८४० मिली लीटर देशी दारु किंमती १९००/—रू तसेच जुगारातुन किंमती १०,३०० रु—/ असा एकुण किंमती १२,७००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक ०२ केसेस ,तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.